**महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ अनुसार महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगासाठी 'विभाग प्रमुख' घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आरटीएस- २०१९/प्र. क्र. ७०/१८ ( र. व का. )**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ९ ऑगस्ट, २०१९

**वाचा :**

१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : आरटीएस - २०१७/प्र.क्र.५३/१८(र.व का.), दिनांक २० मार्च, २०१७.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम १३ मधील तरतूदीनुसार राज्य शासनाकरीता दिनांक ३० जुलै, २०१६ च्या अधिसूचनेन्वये 'महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग' घटीत करण्यात आला आहे. तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक मधील अनुक्रमांक-१, नियम क्रमांक २ अनुसार मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत नियमाखाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांनुसार दिनांक २० मार्च, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे ' राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त' कार्यालयातील उपसचिव यांना महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे 'विभागप्रमुख' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

२. या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ च्या नियम ९ (२२) अनुसार महाराष्ट्र नागरी सेवा नियमांच्या प्रयोजनांसाठी ' राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त' कार्यालयातील सह / उपसचिव यांना महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे 'विभागप्रमुख' म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१९०८१४११४४१३०९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Medha Gadgil
Date: 2019.08.14 11:56:33 +05'30'

**( मेधा गाडगीळ )**
**शासनाचे अपर मुख्य सचिव ( प्र. सु. र. व का. )**

**प्रति,**

१. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२. प्रधान महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) -१, महाराष्ट्र, मुंबई,
३. प्रधान महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) -२, महाराष्ट्र, नागपूर,
४. प्रधान महालेखापाल ( लेखापरीक्षा ) -१, महाराष्ट्र, मुंबई,
५. प्रधान महालेखापाल ( लेखापरीक्षा ) -२, महाराष्ट्र, नागपूर,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
७. उपसचिव, राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
८. उपसचिव / अवर सचिव, कार्यासन-२६ / कार्यासन १९-अ, सामान्य प्रशासन विभाग,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०.निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
११.संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१२.कक्ष अधिकारी, कार्यासन सेवा-६, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
१३.निवड नस्ती ( कार्यासन १८ ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.